# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

---

**दिनांक १५.०९.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १४.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण ५,०५,०१५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करून एकुण ९१,२३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,१९७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ८,४०,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १४.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १५.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा पोलीसांची संयुक्तीक कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०९.२०२६ चे ००.३० वा. ते ०२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, लक्ष्मीभवन चौक जवळील 'सेकंड फ्लोर कॅफे' येथे उशिरापर्यंत हुक्का पार्लर सुरु आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफे मालक व मॅनेजर यांनी कॅफेचे गेट आतुन व बाहेरुन बंद करुन व कुलुप लावून, आतमध्ये ग्राहकांना हुक्का पुरवित असल्याचे निदर्शनास आले. कॅफेमध्ये दुसऱ्या मार्गाने प्रवेश केला असता, किचनमध्ये दोन इसम व काऊंटरवर एक इसम तसेच, कॅफेमध्ये एकुण २३ ग्राहक दिसुन आले. त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे १) कॅफे मालक सन्नी विकास बोरकर, वय २६ वर्ष, रा. आंबेडकर नगर, धरमपेठ गाडगा, सिताबर्डी, नागपूर असे सांगून, तो शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ कॅफेकमध्ये काम करणारे वेटर आरोपी क्र. २) सार्थक बाबाराव पखाले वय १८ वर्ष रा. शेगाव नाका, देशमुख लॉनचे मागे, अमरावती ३) हर्ष नरेश धुर्वे वय २३ वर्ष रा. हनुमान मंदीरजवळ, गोंड मोहल्ला, अंबाझरी टेकडी, नागपूर यांचे मदतीने ग्राहक आरोपी क्र. ४) लिओन विल्सन फोरताडो वय ३४ वर्ष रा. जाफरनगर, नागपूर ५) आदिती विजय तेलंग वय ३५ वर्ष रा. फ्रेन्डस कॉलनी, नागपूर ६) विशाल अनिल साधवानी वय २६ वर्ष रा. जरीपटका, नागपूर ७) विक्रांत विलास भांडारकर वय २५ वर्ष रा. न्यु सुभेदार ले आऊट, नागपूर ८) रिहान अब्दुल अली खान वय ३० वर्ष रा. महाल, नागपूर ९) तुषार किसन गरडे वय २१ वर्ष रा. गड्डीगोदाम, नागपूर १०) मोहम्मद यतेखान मोहम्मद शकील वय २८ वर्ष रा. महाल, नागपूर ११) तन्मय ज्ञानेश्वर इटनकर वय २४ वर्ष रा. राजाबाक्षा हनुमान

मंदीरजवळ, नागपूर १२) आशिष गणेश बयार वय ३२ वर्ष रा. मनिषगनगर, नागपूर १३) मोहसीन खान हसन खान वय ४० वर्ष रा. भांडेप्लॉट चौक, नागपूर १४) रुषी रमेश बहल वय २४ वर्ष रा. हनुमान नगर, नागपूर १५) पियुष राजेंद्र झोडापे रा. हिलटॉप, नागपूर १६) निकुंश निलेश जनबंधु वय २२ वर्ष रा. गड्डीगोदाम, नागपूर १७) हर्षल राजेश नितनवरे वय २१ वर्ष रा. जयताळा, नागपूर १८) प्रज्वल नितीन डोंगरे वय २४ वर्ष रा. सोनेगाव, नागपूर १९) साई खान फारुख खान वय २३ वर्ष रा. सोनेगाव, नागपूर २०) लक्की हरीष खुराणा वय २७ वर्ष रा. शांतीनगर कॉलनी, नागपूर २१) आदित्य शाम बारापात्रे वय २२ वर्ष रा. आंनदनगर, नागपूर २२) निशा योगेश हाडके वय २६ वर्ष रा. चांडक ले आऊट, नागपूर २३) रेहान शेख सलीम शेख वय १९ वर्ष रा. हंसापुरी, नागपूर २४) शेख अदनान शेख उजाज वय २३ वर्ष रा. हंसापुरी, नागपूर २५) मयुर शेखर तभाने वय ३७ वर्ष रा. माटेचौक, नागपूर २६) पुवार्थ श्रीराम बेलखेडे वय २२ वर्ष रा. कन्हान नागपूर यांना सेवनाकरीता शासन प्रतिबंधीत हुक्का पदार्थ पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी क्र. १ यास हुक्काबाबत परवाना विचारला असता, त्याने परवाना नसल्याचे सांगितल्याने, आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्कापार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. तसेच, आरोपी हा त्याची आस्थापना शासन निर्धारित वेळमर्यादपेक्षा अधिक काळ सुरु ठेऊन, अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असतांना समक्ष मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, हुक्का नळया, दोन वेगवेगळया कंपन्यांचे एलईडी टिव्ही, ०४ सोफा, एक रेफ्रीजरेटर, एक डिव्हीआर, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण २,०२,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी कॅफेमालक, वेटर व ग्राहक आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम २२१,२७२ भान्यासं. सहकलम ४,६,७,८,२०,२१,२४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने प्रतिबंधक अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८, सहकलम ३३ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा युनिट क्र. २ च्या मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, पोहवा. कमलेश गनेर, प्रविण शेळके, महेंद्र सडमाके, कमलेश गहलोत, पोअं. राहुल पाटील, विशाल रोकडे व एनडीपीएस पथकाचे सपोनि. आनंद बिचेवार तसेच, युनिट क्र. ३ चे सफौ. संतोषसिंग ठाकूर यांनी संयुक्तीकरित्या केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. ०३ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ३०.०८.२०२६ चे ००.०५ वा. ते ३१.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत, हरदास नगर, कामठी येथे राहणारे फिर्यादी निखील सुरेश नगरकर वय ३१ वर्षे यांनी त्यांची सुजुकी दुचाकी गाडी क्र. एम.एच. ४० डीएफ ५३८० किंमती ८०,०००/—रू. ची पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत, कामठी—कन्हान रस्त्यावरील रंजनाबाई पानतपावणे यांचे दुकानाजवळ लॉक करून, पार्क करून आपले कामावर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे आषुतोश रतिराम यादव वय १९ वर्षे, रा. सुनवारा, ता. धनोरा, जि. शिवनी (मध्यप्रदेश) यास ताब्यात घेवुन, त्यास गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी बलराम दुबे वय १९ वर्ष रा. शुक्लानगर, जबलपुर (मध्यप्रदेश) याचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने या गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत—०१ व राणा प्रतापनगर हद्यीत—०१ असे एकुण ०३ वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्ह्यात अटक करून, त्याचे ताब्यातुन चोरी केलेले १) सुजुकी दुचाकी गाडी क्र. एम.एच. ४० डीएफ ५३८० २) सुजुकी ॲक्सेस गाडी क्र. एम.एच. ४० डीजी २६०३ आणि ३) सुजुकी ॲक्सेस गाडी क्र. एम.एच. ३७ एजे २७७४ असे एकुण ०३ दुचाकी वाहने किंमती २,४०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी जुनी कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>४) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— गांजा विक्री करणाऱ्या पाहिजे आरोपीस अटक.</u>**

दिनांक १३.०९.२०२६ चे २२.२० ते २३.२५ वा. चे दरम्यान, हुडकेश्वर पोलीसांनी त्यांना प्राप्त खात्रीशीर माहितीवरुन, सिद्धेश्वरी नगर झोपडपट्टी जवळील मोकळ्या मैदानामध्ये गांजाविक्री करणारे इसमांवर पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथून आरोपी आकाश सुर्यभान उगले, वय २६ वर्षे, रा. धनगवळी नगर,

प्लॉट क्र. १७, पिपळा रोड, हुडकेश्वर, नागपूर यास त्याचे वाहन व अंमली पदार्थ गांजासह ताब्यात घेतले होते व त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नागेश्वर उर्फ सोनु श्यामराव मसराम रा. विश्वकर्मा नगर, गली क्र. ९, नागपूर हा अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरुन पळून गेला होता. कारवाई वेळी आरोपीचे ताब्यातुन रोख, गांजा, मोबाईल फोन व २ मोटर सायकली असा एकुण २,३२,०१०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तेव्हापासुन पाहीजे आरोपीचा शोध घेणे सुरू होते.

दिनांक १५.०९.२०२६ चे मध्यरात्री पेट्रोलींग दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार हे पाहिजे आरोपीचा शोध घेत असता, त्यांनी मिळालेल्या माहितीवरुन, आरोपी नागेश्वर उर्फ सोनु श्यामराव मसराम वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. १०, विश्वकर्मा नगर, गली क्र. ०९, अजनी, नागपूर यास ताब्यात घेतले. आरोपीस अटक करून, पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्र. २ च्या मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १४.०९.२०२६ चे १६.१५ वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, पिपळा फाटा बसस्टॉप जवळ, एक इसम येणारे—जाणारे लोकांना शिवीगाळी करुन, धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकित उर्फ बारीक तुलसीराम बिसेन वय २२ वर्षे रा. हुडकेश्वर खुर्द, गुरुदेव ले आऊट, प्लॉट क्र. ६ ता. कुही जि. नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने फिर्यादी पोहवा. प्रविण जांभुळकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १४.०९.२०२६ चे ००.४५ वा. ते १२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्‌दीत, प्लॉट क्र. १३५, जानकी नगर, निकीता ज्वेलर्सचे गल्लीत, निलज धुमाळ यांचे घरी किरायाने, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. संध्या प्रकाश बैलमारे वय ३९ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे नातेवाईकाचे अंत्यसंस्काराकरीता कन्हाळगाव येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडून, घराचे आंत प्रवेश करून, घरातील आलमारीतील रोख २०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,०२,०५४/—रू. चा मुद्‌देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. नरेश साखरकर ९३२२२२४२४५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४०३१६ /२००५ | कलम ३२४, २९४,५०६, ३४ भा.दं.वि. | १) बबलु अमनीप्रसाद मिश्रा, २) सुरेश रामलखन मिश्रा, २) रमेश रामनारायण पांडे, तिघेही रा. संजय नगर, पांढराबोडी, बाबा राठोड चे घराजवळ, अंबाझरी, नागपुर. | २१.०९.२०२६ |

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**